# मिरा भाईंदर महानगरपालिका
## सार्व. आरोग्य विभाग

सन २०२२-२३

# // करारनामा //

कंत्राटदाराचे नाव :- **मे. मनोहर ट्रेडींग कंपनी**
५/सी, बॉम्बे मार्केट, स्टेशन रोड,
भाईंदर (प.)

कामाचे नाव :- **10 BHP ते 19 BHP क्षमता सक्शन पंप पुरवठा.**

कामाची मंजुरी :- **मा. आयुक्त दि. 10/06/2022.**

Scanned with CamScanner

# CHALLAN
## MTR Form Number-6

| GRN | MH003403564202223E | BARCODE | | Date | 15/06/2022-12:39:38 | Form ID | |
|---|---|---|---|---|---|---|---|

| Department | Inspector General Of Registration | Payer Details | |
|---|---|---|---|
| Type of Payment | Non-Judicial Stamps-Consolidated Stamp Duty Superintendent of Stamps | TAX ID / TAN (If Any) | |
| | | PAN No.(If Applicable) | |
| Office Name | THD_JT DIST REGISTRAR THANE RURAL | Full Name | MANOHAR TRADING COMPANY |
| Location | THANE | | |
| Year | 2022-2023 One Time | Flat/Block No. | C 5 BOMBAY MARKET BLDG |

| Account Head Details | Amount In Rs. | | |
|---|---|---|---|
| | | Premises/Building | |
| 0030045501 Consolidated Stamp Duty85 | 7500.00 | Road/Street | STATION ROAD |
| | | Area/Locality | BHAYANDER |
| | | Town/City/District | |
| | | PIN | 4 0 1 1 0 1 |
| | | Remarks (If Any) | FRANKING FOR AGREEMENT |
| | | Amount In Words | Seven Thousand Five Hundred Rupees Only |
| Total | 7,500.00 | | |

| Payment Details | BANK OF BARODA | FOR USE IN RECEIVING BANK | | | |
|---|---|---|---|---|---|
| Cheque-DD Details | | Bank CIN | Ref. No. | 02003942022061500579 | 1290632350 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 15/06/2022-00:40:59 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | BANK OF BARODA | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID : Mobile No. : 9820053129

**NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.**
सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोदंणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोदंणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही.



**Print Date 15-06-2022 05:54:29**

Scanned with CamScanner

# // करारनामा //

करारनमा लिहून देणार :- **मे. मनोहर ट्रेडींग कंपनी**
५/सी, बॉम्बे मार्केट, स्टेशन रोड,
भाईंदर (प.).

करारनामा लिहून घेणार :- **उपायुक्त (आरोग्य),**
मिरा भाईंदर महानगरपालिका

कारणे करारनामा लिहून देण्यात येते की, . . . . . . . . .

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात सावचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी सार्व. आरोग्य विभागाकरीता 10 BHP ते 19 BHP क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा कामाकरीता करारनामा लिहून देणार यांचे दर स्विकारणेस मा. आयुक्त यांनी दि. 10/06/2022 रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार काम पुर्ण करुन देण्याची जबाबदारी करारनामा लिहून देणार यांची राहील.

## अनुसुची :-

| Sr. No. | Type of Suction Pump | मंजुर दर |
|---|---|---|
| 1 | Dewatering on BHP by using water pump including diversion of stream, providing cofferdams, earthern bunds etc. as may be necessary for foundation and other parts of the works and pumping out water during and after excavation as may be required by using 10 to 19 BHP pump etc. complete. | **Rs. 340 Per Hour** |
| 2 | Providing Labour including required safety precaution | **Rs. 140 Per Hour** |

खालीलप्रमाणे अटी शर्ती बंधनकारक आहेत........

१) निविदाकाराने महापालिका सांगेल त्या ठिकाणी सखल भागात आवश्यकतेनुसार विविध क्षमतेचे सक्शन पंप बसविणे बंधनकारक आहे. **त्याबाबतचा मागणी आदेश परिशिष्ट - 1 वर जोडण्यात आला आहे.**

२) महापालिका क्षेत्रातील पावसाळ्या दरम्यान सखल भागातील पावसाचे पाणी उपसा करणे कामी विविध क्षमतेचे सक्शन पंप, पंप चालक व इंधनासह आवश्यकतेनुसार प्रती तास उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

For MANOHAR TRADING CO

Scanned with CamScanner

३) सक्शन पंप कामाच्या ठिकाणी घेऊन जाण्याचा, वाहतूक करण्याचा संपुर्ण खर्च निविदाकाराने करावयाचा आहे.

४) स्वच्छता निरिक्षक यांच्या मागणी केलेल्या ठिकाणी एक तासात सक्शन पंपचा पुरवठा न केल्यास प्रत्येक विलंब झालेल्या प्रती तासाकरीता प्रती सक्शन पंप रु. १००/- दंड आकारण्यात येईल.

५) स्वच्छता निरिक्षक यांनी मागणी करुनही सक्शन पंपचा पुरवठा न केल्यास प्रती दिन प्रती सक्शन पंप रु. ५००/- दंड आकारण्यात येईल.

६) निविदाकाराने सक्शन मशिन पुरवठा कामाचे चलन बुक स्वखर्चाने छपाई करुन दररोज केलेल्या कामाबाबत संबंधित विभागाच्या स्वच्छता निरिक्षकाची स्वाक्षरी घेवून मुख्य कार्यालय आरोग्य विभाग येथे देणे बंधनकारक राहील. **चलन बुक हे उपायुक्त (आरोग्य) यांचेकडून प्रमाणित करून घ्यावे लागेल.**

७) पावसाळ्या दरम्यान आपत्कालीन परिस्थितीच्या वेळी मागणीनुसार तातडीने सक्शन पंप उपलब्ध करून द्यावयाचे आहेत. जर ठेकेदार सक्शन पंप पुरविणेस असमर्थ ठरला तर, इतर पुरवठादाराकडुन सक्शन पंप घेऊन सदरचे काम पूर्ण करून घेण्यात येईल व जो खर्च येईल तो निविदाधारकाच्या देयकातून/ सुरक्षा अनामतमधून वसुल करण्यांत येईल.

८) निविदाकारातर्फे काम चालु असताना साईटवरील मजूर अथवा जाणा-या येणा-या नागरीकांना त्रास अथवा धोका पोहचल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील. **ज्या सोसायटीमध्ये सक्शन पंप लावण्यात आला असेल, त्या ठिकाणी रहात असलेल्या किमान 02 नागरीकांच्या स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.**

९) निविदाकाराने काम समाधानकारक न केल्यास किंवा काम मध्येच सोडल्यास दंड करणे, ठेका रद्द करणे अथवा नव्याने कंत्राट दिल्यास येणाऱ्या संपुर्ण खर्चाची रक्कम दंडासह वसुल करण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील.

१०) निविदाकारांनी ठेक्याच्या कालावधीत Risk Insurance Policy काढणे बंधनकारक राहील.

११) बाल मजुर कायदा पर्यावरण कायादा १९८६ नियमांचे पालन करणे निविदाकारावर बंधनकारक आहे. याबाबत महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

१२) पाण्याचा उपसा करतेवेळी सक्शन पंपामुळे रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावयाची आहे.

१३) सक्शन पंपद्वारे ज्या ठिकाणी पाणी उपसण्याचे काम करतेवेळी त्या ठिकाणी वित्त व जिवीतहानी झाल्यास त्यात निविदाकार जबाबदार राहील.

१४) बिलातून शासकिय दरानुसार आयकर व इतर कर कपात केली जाईल.

For MANOHAR TRADING CO

Proprietor

Scanned with CamScanner

१५) निविदेसंबंधी काही वाद निर्माण झाल्यास सदरचा वाद ठाणे न्यायालयात सोडविण्यात येईल व सदरचा निर्णय दोन्ही पक्षकारास बंधनकाकर राहील.

१६)मा. स्थायी समिती सभेने पारीत केलेल्या ठरावानुसार कार्यवाही करणे निविदाकारावर बंधनकारक राहील. तसेच सक्शन पंप पुरवठा कामाचे मंजुर केलेले दर कार्यादेश दिल्या पासुन एक वर्षाकरीता कायम राहील.

१७)निविदाकाराने मंजुर दरात पावसाळी पाणी उपसा करणे कामा व्यतिरिक्त इतर कामाकरीता आवश्यकतेनुसार 10 BHP ते 19 BHP सक्शन पंपचा पुरवठा सार्व. आरोग्य विभाग तथा मनपाच्या अन्य विभागास पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१८)निविदाकारावर प्रचलित शासकीय नियम पाळणे तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे निविदाकारावर बंधनकारक राहील.

१९) निविदाकाराने निविदासोबत जोडलेले कागदपत्र, निविदा व इतर कागदपत्र सदर करारनामाचे भाग समझण्यात यावे, व सदर कागदपत्रातील अटीशर्ती दोन्ही पक्षकारास बंधनकारक रहातील.

**करारनामा लिहून देणार**

For MANOHAR TRADING CO

Proprietor

**करारनामा लिहुन घेणार**

16/6/2011

**(रवि पवार)**

**उपायुक्त (आरोग्य)**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

Scanned with CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.
दूरध्वनी: 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985
ईमेल: mbmcho@gmail.com वेबसाईट: www. mbmc.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय**

मिभा / मनपा /आरोग्य/ 934/2022-23 दिनांक: 16/06/2022

## // कार्यादेश //

प्रति,
**मे. मनोहर ट्रेडींग कंपनी**
5/सी, बॉम्बे मार्केट,
स्टेशन रोड, भाईंदर (प.)

**विषय :- मनपा. क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी भाड्याने 10 BHP ते 19 BHP HP क्षमतेचे सक्शन पंप पुरवठा करणे.**

संदर्भ :- 1. दि. 31/05/2022 रोजीची निविदा.
2. दि. 10/06/2022 रोजीची मा. आयुक्त यांची मंजुरी.
3. मा. स्थायी समिती सभा दि. 14/06/2022, ठराव क्र. 36 अन्वये निविदा मंजुरी.
4. दि. 16/06/2022 रोजीचा करारनामा.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात सावचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी सार्व. आरोग्य विभागाकरीता 10 BHP ते 19 BHP क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणेकामी निविदेतील वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर संदर्भ क्र. 03 अन्वये खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

| Sr. No. | Type of Suction Pump | मंजुर दर |
|---|---|---|
| 1 | Dewatering on BHP by using water pump including diversion of stream, providing cofferdams, earthen bunds etc. as may be necessary for foundation and other parts of the works and pumping out water during and after excavation as may be required by using 10 to 19 BHP pump etc. complete. | Rs. 340.00 Per Hour |
| 2 | Providing Labour including required safety precaution | Rs. 140.00 Per Hour |

संबंधित स्वच्छता निरिक्षक यांच्या मागणीनुसार व नियंत्रणाखाली मनपा. क्षेत्रातील सखल /अतिसखल भागात आवश्यकतेनुसार 10 BHP ते 19 BHP क्षमतेचे सक्शन पंप बसविण्यात यावे.

16/6/22

**(रवि पवार)**
**उप-आयुक्त (आरोग्य)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

Scanned with CamScanner